

रतनलाल भंडारी

प्रस्तावना : प्रा. दि. के. बेडेकर

REFBK-0011965
REFBK-0011965
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५९८
१९६१

# मैफल

( काव्यसंग्रह )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८४२६ वि: ०६/०५
क्रमांक १४९८ नों दि: ..........

REFBK-0011965
REFBK-0011965

: लेखक :

रतनलाल भंडारी

११९६५

मूल्य १·५०

सह्याद्रि प्रकाशन
पुणे

: प्रकाशक :
गो. शं सोनसळे
सह्याद्रि प्रकाशन,
१२० नारायण पेठ, पुणें २.

आवृत्ति पहिली सन १९६१

: मुद्रक :
महादेव केशव कुलकर्णी
नीलिमा मुद्रणालय
२३० सदाशिव पेठ, पुणें २.

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 26726 विः काव्य
क्रमांक 15914 नोंः दिः 12/7/6

# प्रस्तावना

वाचक मित्रांस,

माझे मित्र श्री. भंडारी यांची कविता तुम्ही वाचणार आहांतच. पूर्वी सुटी एखादी कविता तुम्ही वाचली असेल. आतां हा संग्रह वाचल्यावर सुट्या त्रुटित अनुभवांतून एकसंघ असें कांहीं तुम्हांला जाणवेल. नानाविध अनुभवांनीं घेतलेलीं प्रतीकांचीं रूपें व आकांक्षांनीं घेतलेले आकार कवितेंतून डोकावतात. तसेंच या संग्रहांत तुम्हाला आढळेल. 'नवकविता' म्हणजे नेमकें कांहीं असो, पण तिच्यामध्यें कांहीं नव्या संकेतांचा वावर दिसतो. श्री. भंडारी यांनीं हे संकेत व संस्कार टिपून घेतलेले दिसतात. वर जो 'एकसंध' पणा मी सांगितला तो या संस्कारांना एकत्र करणारा कांहीं तरी 'मी' पणा आहे. या 'मी'पणाशिवाय कविता कोणी लिहीलच कशाला ?

श्री. भंडारी यांच्या कवितेंत सरळ वर वर दिसणारे रंग व रूपें थोडीं डोळ्यांआड केलीं म्हणजे एक खालचा थर उमगतो. त्याला वाचा फोडण्यासाठींच कवितेच्या रंगरूपांनीं बोलकें होण्याचा प्रयत्न कवीचा आहे. 'माझा गांव' ही त्याची साधी व म्हणूनच स्पष्ट पारदर्शक कविता त्यांच्या कवितेची एकंदर प्रकृति दाखविणारी आहे. क्षितिजाच्या अस्ताव्यस्त व्यासावर हा गांव 'मंद जळत' आहे. चारदोन ओळींत या मंद जळण्याचें वर्णन करून कवि सांगतो कीं या गांवच्या माळावर दगड व गोटे सुस्त पडले असून 'रामाच्या पदस्पर्शाची' जणू वाट पहात आहेत.

मंद जळण्यांतहि तीव्रतेनें भासणारी रामपदस्पर्शाची उत्कंठा ‘ गांवा ’ची आहे कां तिथल्या ‘ दगडाची ’ आहे ? कां गांव हे केवळ मिष असून ही माणसाची चिरंतन उत्कंठा आहे ? माणसाला अणूच्या अंतरंगांतील शक्तीला स्पर्श करून हें ईप्सित गवसेल कां ? कां चंद्रावर पाय टेकवून माणसाला कृतार्थ वाटेल ? कोठल्या रामाची वनवासी पावलें माणसाला दगडपणांतून जागें करतील ?

असें प्रश्न आपण मंद जळत्या माणसांनीं विचारूं नयेत व त्या प्रश्नांचीं व उत्तरांचीं उपाधि आपल्या अंगाला चिकटवून घेऊं नये. पण कवींना असेच प्रश्न मोठें जिव्हाळ्याचे वाटतात. उत्तरें ! तीं देण्यासाठीं मग कवि कोणा ‘ मांत्रिकाला ’ बोलावतो, ‘ तांडवनृत्य करणाऱ्या भोळ्या सांबाला ’ साद घालतो आणि या सादेंतून कवितेच्या रंगरूपांखालील आर्तता ऐकूं येऊं लागते.

वाचक मित्रांना माझी एवढीच विनंति कीं या कविता वाचतांना मन सढळ करून वाचाव्या; कारण येथें तंत्राची कांटेकोर साधना नाहीं. व प्रतिभेची आश्चर्यचकित करणारी झेप नाहीं. पण गद्यांत न सामावणारी उत्कंठा व तरुण व्यथा आहे. असमाधान आहे व उद्यांचें कांहींतरी आकर्षण आहे. तेवढा स्पर्श माझ्या मनाला झाला व म्हणून ह्या कवीची ही ओळख तुम्हाला करून देत आहे.

पुणें
ता. १२।१२।६०

आपला
**दि. के. बेडेकर**

चि. सुजातास–

आभार-

☆ सुदर्शन

★ साधना

★ फर्गसन

★ ऑल इंडिया रेडिओ, पुणें केन्द्र

★ प्रताप मुळीक

★ ल. ना. फडतरे

आणि

★ प्रा. दि. के. बेडेकर

मध्य रात्रिच्या मैफलींत या

मीहि गातो अेक रागीणी

स्वरा–सुरांची मीलन समाधी

सेवा पहिली तुमच्या चरणी

# शुद्धी-पत्र

| पान अनुक्रम | | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९ | | अव्यव | अव्यय |
| २० | ओळ १० वी | पारखा | पारवा |
| २२ | ओळ १६ वी | खुयणाऱ्या | खुपणाऱ्या |
| २९ | ओळ ११ वी | येथें | तेंथें |
| ४२ | ओळ ११ वी | प्रीतिचा | प्रीतीचा |
| ४२ | ओळ १२ वी | जळूम | जळून |
| ४८ | ओळ ५ वी | घेअन | घेऊन |

★

## १ : मैफल

११०६५

प्रकाशाची फाटकी तुटकी वस्त्रें घेऊन
चार सावल्या इथें हितगुज करतात.
जळालेले सुंभ आव्हान देतात विश्वाला;
फाटकी मनें स्वप्नें ओकतात तांडवाची.

आठ डोळे......आठ हात
हजार कथा......अेक अुपाय
तांडव......तांडव......तांडव !
काळोखाची भक्कम भिंत
कापीत जातो डमरुचा नाद;
शिल्लक रहातो फक्त जीर्ण साद.

दु:खानें झिंगलेली मनें
लाखोली मोजतात समाजपुरुषाला
तयारी करतात ओंकारेश्वराची;
खप्पड गाल......कुजलेली चौकट
कोसळण्याची, निस्तेज होण्याची

अेक स्वप्न......दुसरे स्वप्न......हजार स्वप्नें
क्षितिजावर प्राची फुलण्या पूर्वीचीं
पहाटेची स्वप्नें......खरी होणारी स्वप्नें
रक्ता रक्तांतून रंगणारीं......ज्वालेंतून उजळणारीं

कधीं मीहि जातो
झिंगून जातो, फाटलेलें मन घेऊन जातो.
या मैफलींत बेहोष होतो;
रेशमी धाग्यांच्या पडद्या आडून
उद्यांच्या विश्वाला न्याहळून घेतो.

कुठे आहे ही मैफल ?
मला विचारुं नका.
सांभाळून पाऊल टाका;
माझ्या मुखांत जागृत ज्वालामुखी आहे !

इथल्या कथा अैकायच्यात तुम्हाला ?
इथें रंगदार लावणी नाचत नाहीं,
नेहमी भैरवीचे सूर जळत असतात !

जरा बाजूला पहा–राखेच्या ढिगाखालीं
वाळलेल्या हाताच्या सामर्थ्यवान मुठींत
तिची वाट आहे
कधींतरी जरूर पडेल,
तुमच्या हिताची गोष्ट आहे.

पण त्यासाठीं अग्निदिव्य करावे लागेल—
फाटून जाण्याचे, रक्त ओकण्याचें.
स्वतःचे मस्तक रणचंडीला अर्पण करण्याचे.

तरच तुमचे अंकूर
जळलेल्या कुरणांतून
कुजलेल्या चौकटीच्या थडग्यावर
बेहोषपणें फुलून येतील.

—ऑल इंडिया रेडिओ पुणें केन्द्र यांचे सौजन्यानें

★

## २ : खूण

आजवरी तूं आलीस गेलीस
ग्रहण लागले ना नजरेला
पीस स्मृतीचे ठेऊनी विरला--
आज तुझा तो गजरा हसरा.

★

## ३ : श्रद्धा

मरुताच्या भैरवीत कण्हती
गळलेल्या पर्णांची दुःखें
शिशिराच्या निश्वासी खुलती
वासंतिक शृंगारिक स्वप्नें

★

## ४: अव्यव

विरहाचा शिरपेच खोचूनी
मिरवितेस तूं अैट सतीची
बोल तुला मी कशास लावूं
प्रीती माझी अव्यय होती

★

## ५: समस्या

रंग तुझ्या प्रीतिचा
राधेच्या जातिचा
ढंग माझ्या प्रीतिचा
सभ्यांच्या नीतिचा

★

# ६ : तारुण्याच्या नववेदीवर

तारुण्याच्या नववेदीवर

नवी कहाणी, नवीन स्वप्नें
नवीन गाणी, नवी बंधनें

नवतेचें हे गीत पुरातन
नवतेची ही जुनीच गमकें
विसर आतां तूं जुनी कहाणी
आटपाट नगरीची राणी
आव्हान तुला हे नवविश्वाचें
प्राचीच्या फुलत्या लालीचें
तूंहि बदल अन् जगा बदल तूं
अतां अर्जूना शस्त्र धरीं तूं

तारुण्याच्या नववेदीवर

नवी कहाणी, नवीन स्वप्नें
नवीन गाणी, नवी बंधनें

★

# ७ः श्रावण

गंध मातिचा सुटतो
श्रावण हसू पोराचें हसतो
पांढरींतलीं ओली बाजरी
मनांत खुलवी स्वप्न रुपेरी

वडा खालच्या झोक्याची प्रज्ञा
नेत्रांत सांठवी क्षितीज संज्ञा
वारा हसतो, खेळतो
बोल बोबडे बोलतो

अंबराईचा पदर ओढितो
लाह्या नागोबाच्या चोरीतों
मनांत गंध सांडत सावली
फेर घरून नाचे पोर बावळी.

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 2८४२५ वि: आ०३
क्रमांक ७५१८ नों दि १२।३।६५

## ८ : व्यथा

रोज व्यथा जडावी
व्हावा व्यथेचाच सोस,

पहाताच महारोगी
आठवावा महायोगी.

व्यथा माझी सप्तरंगी
जशी मीरेची समाधी,

जणू शंकराचा कंठमणी
व्यथा अपेक्षीतो बळी.

कधीं सामर्थ्याचा गर्व
जशी नभींची तारका

स्पर्शताच अविलत्व
होतो क्षणांत अुल्का.

व्यथा व्यथा जोडोनि
व्हावा इतिहास जीवनीं

जेथें व्यथेची समाप्ती
तेथें संपावी कहाणी

★

## ९ : माझं गांव

क्षितीजाच्या या व्यासावरती
मंद जळतसे गांव आगळा

भारतभूच्या अंका वरती
कुढत चालतो गांव निराळा

इथले पाणी खळखळ करिते
नव्या युगाच्या नव निष्ठांशी

आणि बोबड्या तारुण्याला
नित्य परवचा सन्मार्गाचा.

इथल्या फुलत्या कोमार्याला
लग्न मंडपीं मोहर येतो

कधीं नीतिला टांग मारुनी
बहार पहिला मूच्छित होतो.

या गांवाच्या माळा वरती
दगड नि गोटे सुस्त पहुडले

स्पर्श अजूनि त्यांना नाहीं
श्रीरामाच्या पद कमलांचा

★

## १०: असें व्हावे कांहीं

असें व्हावे कांहीं
फुटावा कुडीचा कोष
अुडावे भावनांचें पाखरुं
अुल्लंघून बंधनाचे मेरु

असे व्हावे कांहीं
अुघडावा शंकरानें नेत्र
पेटावी क्रांतिची मशाल
निर्माया जीवन विशाल

असें व्हावे महाभारत
त्यांत जळावी कायमची रात्र
तुटावे राधेचे बंध
सुटावा प्रितिचा गंध

व्हावे असें कांहीं तरी
विश्वाच्या अंकावरी
बागडावी अंतरीची तृष्णा
घेअूनि सत्याचा आकार

★

# ११ : अंबरठ्यावर

जरा थांबलीस दाराशी
काय आलं ग मनांत
पहा पात्रांतील दूध
आले थोडे शहारुन
मला ठाऊक सारे
तुझ्या मनांतील भाव
तुझ्या मनीच्या घुमटीं
घुमे आंबराईचा वात
रुप गांवच्या माळाचें
शब्द तेथल्या पक्षांचे
तुझ्या दोन अश्रूं संगे
आज जाहले कृतार्थ
मला भेटला कधीं तो
मी सांगेन तयाला
"यौवनाचें स्वप्न तुझ्या
आज फुलते कुंडींत"
नको बावरुस वेडे
स्वारी आहेग प्रेमळ
जरा सावर स्वत:ला
जरा आवर मनाला
नको होऊस मुग्ध
नको ढाळूंस अश्रूं
आज बदलले सारे
आतां बदलले रुळ

★

## १२: नवजीवन

दृष्टि स्पर्शते जुन्याच प्रतिमा
काळी टिकली लेउनि गाली,

मद्याच्या प्याल्या मधली,
रंगत आतां गहिरी झाली.

आकाशांतील कोर बिजेची
पुन्हा न्याहळी विश्व सुगंधी,

बोधी वृक्षाखालून आतां
निर्वाणाची घुमते वाणी.

आजच फुलली नवी पालवी
शिशिरांतील वेण्या नंतर.

आज पसरलें पंख पुन्हा
फोडण्यास क्षितिजाची कक्षा

★

# १३ : असा व्हावा अंत !

शुभ्र रजतशा स्वप्नाला
निळ्या निळाईचा वेध.

परिघाच्या किनारीं
लाल बारीकशी रेघ.

फडफडल्या पंखांना
साफल्याची आस.

बाहुल्यांच्या आसावर
चाले हिरवा हिरवा रास.

आज शृंगारिली कोणी
सोळाव्याची शेज.

नका करुं आक्रोश
" ताटी उघडा ज्ञानेश. "

असा व्हावा अंत
असा व्हावा अंत.

★

## १४ : वेडे

अजूनि नाही हंसली राधा
अजूनि नाहीं हंसला कान्हा

मूग्ध अुभी ती यमुना वेडी
पहात त्यांच्या बालीश लीला.

लाख तारका विझून गेल्या
ज्योति सगळया निजून गेल्या

तरीहि मुरली नाहीं हंसली
वेडे मधुवन नाहीं चळले.

रविकर आला लगाम खेचीत
कणाकणांवर अमृत सिंचीत

चक्र धराचा स्पर्श जाहला
मुरली वेडी घुमूं लागली

हंसरी यमुना घेअून कटीवर
राधा हंसली नेत्र मिटूनि

स्वर वेडे ते मनांत घोळीत
राधा वेडी घरी परतली

★

# १५: अुषा स्वप्न

अशा गुलाबी स्वप्नामधली
निथळत यावी खाली धुंदी
नेत्र अुघडूनि निळसर गहिरें
प्राशुनि घ्यावे धुके शराबी.

तलम चिकाच्या पड्द्या आडून
फूल गळावें प्राजक्ताचें
हळूंच त्याला हृदयीं घेअून
शब्द फुलावे सप्त रसाचे.

मग प्राचिच्या कौमार्याला
यावी अुषेची राजस मस्ती
अन् चंद्राच्या हिंदोळ्यावर
विरुन जावी माझी हस्ती

★

# १६ : अभिसाराचा भंगे मंचक

तुझ्या स्कंधीचा पदरच ढळला
मनीच्या माझ्या मन्मथ चळला

कर्ण अेकटा पाहून अुघडा
आज द्रौपदी भ्रष्ट जाहली
स्मशानातल्या तांडव नृत्या
आज विसरला शंकर भोळा
लाख कवाडें अुघडी झाली
लाख पांखरें अुडूनि गेली
लज्जेच्या बंदिस्त महालीं
घुमा पारवा घुमूं लागला
त्या नादानें जागे झालें
औचित्याचे बरची भाले
मनांत माझ्या रक्त अुडालें
घुमा पारवा जखमी झाला
इंद्राच्या हो मीलना पूर्वी
सती अहिल्या शिळा जाहली
'सेने,च्या या सजल्या सदनीं
अभिसाराचा भंगे मंचक

*

## १७ :

तुझ्या शब्दांना सखे, पारिजाताचा गंध
स्पर्शतांच भावना माझ्या दरवळते अंगअंग

अगा गौतमाच्या कांते, सावर तुझी वल्कलें
आत्मा इंद्राचा, गौतमाच्या वेषांत बसे

★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११९६५

## १८ : सुरवंट

तुझ्या स्वप्नांत लाल प्रकाशाचे दीप
तुझ्या नयनांत मेनकेचे अश्रू गीत
तुझ्या थरथरत्या ओठीं भविष्याची लक्तरें
सौभाग्यकांक्षिणी माते,
मूल्य मातृत्वाचे तुलाच कळे.

★

## १९ : अपेक्षा

अपेक्षेचें हृदय कोंदण
श्रद्धेसह पाघळून गेलें

अनाथ अपेक्षा
आक्रंदते अरण्यांत

श्रद्धेच्या पुंगीवर
डोलणारा भवितव्याचा नाग
डसला आज गारुडचाला
शेवटच्या चार श्वासावर

आतां अुतारा पाहिजे जहरावर
नव्या अस्मितेचा
नव्या स्वतंत्र विश्वासाचा
कुणी द्याल कां ?
कुणी अुतराल कां ?

अे मांत्रिका ये !
तुझ्या सगळचा साधनेसह ये ! !
आणि खुयणाऱ्या अपेक्षेला
सामर्थ्याचें सौंदर्य दे.

★

## २० :

देवयानीची व्यथा मनाची,
कळेल कां कधीं सांगा जगती ?

प्रियकर वेडा कोडे घालुनी,
तिला हिणवूनी हंसतो वरती ! '

पराभवांतूनी अुर्मी अुठूंदे,
नित्य जळूं द्या शर्मिष्ठेला ॥

सौंदर्याचा कुंभ घेअूनी,
ययातिलाहि असे कढूं द्या ॥

तरी मनाची आग विझेना,
संहाराची मशाल घेअून ॥

फक्त अेकदा कळ लागावी,
ओंकाराच्या अजय मुलाला "

★

## २१:

गलगोथाच्या माथ्यावरती,
ताठ अुभा मी असाच राहीन।

मृत्यु माझ्या जवळीं येतां,
कबुतराचें पीसहि होईन।

चल चल मृत्यु, मार भरारी,
इथें गुंजते अखंड संगीत।

आम्ही नटविली विश्वसुंदरी,
इथें अुद्याचें भविष्य नाचत।

अश्वमेध बघ सुरुं जाहला,
भंग जाहली क्षितिज समाधी।

ग्रहा ग्रहावर निशाण आमुचे,
सिद्ध रहा बघ तुझीच पाळी।

★

## २२ :

माझ्या मनांची गुपितें मखमाली, हिरवट
तुला ठाऊक ताई,

माझ्या भावनांचे ऋतु सहा
तुला माहीत बाई,

हळदिच्या कांतिनें गेलीस मागे
आज आलीस भरल्या ओटीनें,

वर्षें लोटली आतां दोन
तरी भावासाठीं ओढते मन,

कधीं सांगशी तिकडच्या गोष्टीं
स्वारी अैटबाज, कुर्रेबाज,

कधीं नेत्रांतील गंगेनें
सावरशी तिकडची लाज,

कधीं रुंदावल्या दुपारीं
नजर टाकून बाजूला,

अैकविशी कुरबूर
बोल लावित सासूला,

दीर धाकला, अवखळ
तुझ्या मायेनें हरखला,

नणंद थोराड, चोंबडी
कान लावते दाराला,

आज आलीस माहेरा
अंकी रायाची प्रतिमा,

कौतुकाविन सानुल्यांच्या
कांटा मिनिटांचा पळेना,

कधीं बिजेचें आमंत्रण
ओवाळणीसाठीं माजवून रण,

आणि येतेस फुलून
गोष्ट वहिणींची काढून,

ऑल इंडिया रेडिओ पुणें केंद्र यांचे सौजन्यानें.

★

## २३ :

रात्रींचा खंजीर खुपसून काळजांत
प्रज्ञेनें केली आत्म्याची हत्त्या

मेलेल्या मुड्यावर, न्याय देवतेचे आसन
कुजलेली प्रेतें, फाडितो आनंदें वैद्यराज.

शिक्षा आहे साधी कैद
जीवन जगणें बारा तास
आमची नेहमी मंगळाची रास
आम्ही झालो सराईत
रोज खंजीराची आंस
आम्हा लागे, आत्महत्येचा सोस.

काळ्यापाण्याची न ही आगळी शिक्षा
गुन्हेगारीची आम्हा जन्मतांच दिक्षा

वेडे वेटोळे आंधळे फिरते
धुंडाळीत चैतन्याचे घट
निराश होऊनि कोवळें पोर
नरडीस नख लावते रात
रामाच्या प्रहरीं मर्ढेकरी

★

## २४:

शब्दांचा तर अर्थ संपला
अव्यय वरीते अुद्गाराला

आतां कशाला इथर वटवट
नजर मारता नजरेला कातर
मनांमनांतील सागर अंतर
गिळून घेते भाव मनांतील

वरती काळी भिवई करते
कथ्थकांतली मुद्रा पहिली
जनमेजय तो शंकीत पाहूनि
नेत्राचे तव बोर खारकी

मला न भीति तव शक्तिची
सज्ज मी तरी घेअूनि आयुधें
फक्त दाखवूं नकोस समरीं
तव गालावर खळी सानुली

★

## २५:

दूर दूर क्षितिजाच्या काठीं
गाभूळलेली संध्या होती,

गालावरची लाल रक्तिमा
स्वरमुरलींतून ठिबकत होती

अशाच वेळीं आलीस तूं गे
स्वप्ना मधली हुडकित धुंदी,

अुत्तरेचा पदर रेशमी
खांद्यावरुनी मिरवीत, झुलवीत.

तुझ्या रुपाला प्राशण्यास बघ
मुग्ध जलाशय हतबल झाला,

नाहीं अुजळलें वर्तुळ येथें
अवकाशाला तोलणारे

अशाच गोंडस चैतन्याला
फुलविण्यास ओष्ठानें प्रतिमा

सरस्वतिचें लेणे माझें.
करपून गेले, जळून गेले,

★

## २६ :

हिरव्या हिरव्या झाडींत
कुठें अेकटाच पक्षी
पंख झडले रे सारे
झडली नाहीं अुड्डाणाची आस.

निळ्या निवळत्या निळाईची
प्रज्ञा प्राशण्या विश्वाची
दोन इवलासे नेत्र
घेती अथांगाचा वेध.

आम्ही सारेच पामर
करुं भूताचा गजर
आणि लपविण्या अपंगत्व
आम्हा ज्ञानियाचे महत्व.

★

## २७:

भर दुपारच्या प्रहरी
आले अंधारुन आभाळ,

आणि पश्चिमेच्या वाऱ्याला
लागे भुताटकीचा चळ,

अुभी सुरुची शेलाटी,
चोरुनि आपुले अंग,

जसा अुभा सन्यस्त
नका करुं समाधीचा भंग.

त्याला भिति वादळाची
त्याला भिति भंगल्या स्वप्नांची

आतां फाटेल आभाळ
आणि सुरू म्हणे, अमंगळ.........अमंगळ,

★

## २८:

शिशिराच्या चांदण्यांत
फिके फिके विश्व उभें,

अवकाशाच्या कवळींत
काळी काळी रात्र जळे,

रुक्मिणीच्या मांडीवर
कृष्ण उदास उदास

आणि डोळियांच्या ठायीं
रंगला गोपींचा रास.

सावलीची कृष्ण काया
अवघडूनि वृक्ष पाही

दूर आळविते 'दीप'
झडलेली वनराई

प्रीतिच्या प्रेतावरी
अश्रूं ढाळी घननीळ

मथुरेच्या वैभवांत
राधा ग्रासते आनंद

हास्य खुलवुनि अधरी
स्मृति लपवूनि अंतरीं

गीता कन्हैया आचरी
जरी मोडली बांसरी

★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम २८७२६ वि: आ?
क्रमांक १५११७ नों. दि: १२।१।७

## २९ :

दूर आरवतो कोंबडा
आणि पहाट फुलेना,

क्षितिजाच्या कडेवरी
आज प्राचीहि हंसेना.

मागें वेदांताच्या कुशींत
कोणी सांगितलें तत्व,

जेव्हां ये भूवरी अुषा
फांकती दाही दिशा,

होतो अंधाराचा ग्रास
चाले लाल रंगीत रास,

आज विश्वहि अुदास
पक्षी सोडीना कोठरी,

आणि तासांच्या कांटयाची
वेडा वदेना भाववाणी,

माझे अुघडतां नेत्र
दिसे रुप विश्वाचें सकल

आणि अेकटा तो ध्रुवबाळ
करी भगवंताचा गजर

अशा शांतशा वेळीं
विधवा अश्रूं गाळी,

आणि जात्यावरची नवी ओवी
माझ्या मना तांत लावी.

★

२९ : अ
आज संपले शर मदनाचें
रिताच भाता खुपतो आहे

आणिक मजनु कुणितरी पागल
अुगाच वणवण फिरतो आहे

रति कुणी अन् कुणि राधिका
संसारातच जळते आहे

आज निराळा रास चालला
नाहीं गवळण नाहीं कान्हा

अन् राधेच्या अुदास सदनीं
फुकाच कढतो अंतरी पान्हा,

★

## ३०.

नव्या नव्या नव आशांनो या
खुणवित अपुला डावा डोळा

जुन्या जुन्यांना मनीं जळूं द्या
पाहुनी तुमचा मुरका नवखा

रंग नसूं द्या इंद्र धनुला
ताण असावा मम चापाला

शब्द नसूं द्या बोलायाला
भाव असावा शोडष वर्षा

इर्षेची ती तहान पिवळी
ग्रिष्मामधल्या कडक अुन्हाची

संध्या समयीं भारुन जावी
नव्या मृगानें सृष्टि सगळी.

★

## ३१

शब्दवेडया षोडशे
बघ वळून माघारी

शब्दा शब्दांना आहे
धार लाघट बोचरी

अर्थहीन वर्तुळीं या
कोणी ओढिल्या शलाका

नको आशयांशी खेळूं
स्पर्श होईल केळीला

गंधवेडे, रंगवेडे
रहा अशीच स्तब्ध

चक्र फिरते सप्तरंगी
रंग होई अेक रंगी
अेक रंगी रंगुनिया
रंग होवो भावरंगी
नलिनी मिटता पाकळी गे
फुलून आली ही शुभांगी.

★

३२:

साऱ्या विश्वाचा पसारा
त्यांत तुक्याचा व्यापार

आणि जमेच्या बाजूला
सारा मायेचा पसारा

अशा बावळ्या ध्यानाला
गेली कंटाळून कांता

म्हणे टाका विणा टाळ
आतां बदलला काळ

X X X

आज इंद्रायणीच्या काठीं
नाहीं तुक्याचा अभंग
आणि आकाश ललाटी
नाहीं इंद्रधनुचा रंग

माजघराच्या खुंटीवरी
मुग्ध असे एकतारी
चिपळ्या स्तब्धशा बैसल्या
आज तुक्या । संसारी

जिजा बावरीशी झाली
म्हणे कुठें गेले ध्यान
कुणी सांगितले तिला
आले वरुनी विमान

वेडे तुला ठाऊक नाहीं
तुका महाराष्ट्राचा राया
होई तयाचा गजर
मृत्यु नंतर तुका थोर .

X X X

आणि इंद्रायणी काठीं
जिजा फोडितसे टाहो
आई, घेग मला पोटीं
आणि थरारले पाणी.

★

## ३३ :

तारकांनी भरलेल्या आकाशी
माडाच्या फूटपट्टी खाली
तू माझी अुंची मोजायला आलीस
मी तुला नकार दिला.

अेखादा यौवनाच्या अुंबरठ्यावरील आदम-
हा गुन्हा करील असं वाटलं तुला
राखेंतून ताजमहाल निर्मायला-
शहाजहानचा निर्लज्जपणा मजकडे नाहीं
माझ्या ठाईं फडफड निर्माण करायला-
तुझें सौंदर्याचें अमृत कुचकामीं आहे.
मागेंच प्यालोय मी तें
त्याची आतां अंबून मदीरा झालीय्
तिच्या वासानें करपशील तूं,
खरं सांगू ?

(अट्टी गट्टी फू करणार नसशील तर...)
तेव्हां मी नकार दिला
आज पश्चाताप नाहीं होत.
तुला कवळायला माझ्या बाहूंचा व्यास
तोकडा होता !

आणि तुझ्या आकांक्षांनी
क्षितीज व्यापून टाकलें होते.

★

## ३४ :

येथें बैसले पांडव
द्युताचा मांडूनि डाव
आणि द्रौपदीच्या आत्म्याचा
आज चालला लिलांव.

द्रौपदिच्या दुःखाची
किती सांगू कहाणी
आणि माझिया लेखणीची
झिजे कोरडीच वाणी.

दुःख माझिया मनींचें
कशासाठीं बसूं गात
आज ओसरें अवधान
मुंबापुरींच्या नरकांत.

किती शब्दांच्या मुशींत
ओतूं आशयांचे घट
शब्द तोलूं मी कशानें
माझी तागडी मोडकी

आणि तुला रक्षिण्यास
माझी आयुधें बोथट

★

## ३५ :

नकोस अुघडूं नेत्र राजसा
अजूनी नाहीं पूर्वा खुलली
आणि निशेच्या साम्राज्याचें
अजूनी जळते अुरले वैभव.

अशाच अेका मध्य रात्रिला
अलिंगन मी दिले पतिला
आणि निशेच्या साम्राज्यानें
मम स्वप्नांचा गळा दाबला.

तुझ्या मुखाचा चंद्र पाहतां
आठवते मज अुमेद पहिली
ठाअक नव्हते तेव्हां मजला
इंद्रधनुला नसते दोरी.

प्रभात होता अुठशील तूंहि
करीत किलबिल लोभसवाणी
हाय ! परंतु अश्वत्थाम्या
तुजला दिधण्या पीठहि नाही

नकोस अुघडूं नेत्र राजसा !!

★

## ३६ : जळलेला मोहर

सुरकुतलेल्या चेहऱ्यावरती
लाल गुलाबी छटा विलसते
मिटलेल्या तव नेत्रीं बाळा
निर्वाणाचीं असे सांगता.

वेलिच्या सान्निध्यांत झोपूनि
चंदनात ती कळी जळाली
कर्णाच्या सह आधुनिक कुंती
नीतिच्या डोहांत बुडाली.

रंगविलेली स्वप्नें पुसली
सजा असे ही भ्याडपणाची
तूं तर होता मोहर प्रीतीचा
फुलण्या आधी जळूम गेला.

तव मातेच्या स्मृति अनंत
नित्य येऊनि अंगाई गाती
छेडलीस कां तार प्रीतीची
गाण्यास्तव तो राग भैरवी.

स्वर्गीचा तूं महान आत्मा
मातेला तो घेऊनि गेला
पिता तुझा तो मनीं स्फुंदतो
लाखोली मोजीतो जगाला

प्रीती होती अशी महान
बंधनास तर नव्हते स्थान
पूर्ण विरामा नंतर आतां
दुःखाची ती घुमे तबकडी.

आपण सारे पुनश्च भेटूं
अज्ञाताच्या पडद्या आड
फक्त अेकदा पाठवून दे
तुकयाचें तें वहान खाली

★

## ३७ :

ख्रिस्ता,

आकाशाचा पुत्र तूं,
चुकलेल्या मेंढरांचा मेंढपाळ तूं
अन्यायाच्या आगींत
आपलीच हाडें भाजून खाणाऱ्या--
मानवतेचा अुद्धारक तूं.

वेड्या,

फुका तुझ्या वल्गना !
आपण काय करतो हे माहित–
नसणाऱ्या कृत्यांचा मुकुट झालास.

थू:

थू: तुझ्या जिनगानीवर.
तुझ्याच सारखा साक्रेटीस होता,
वेडा सारखा वीष पिणारा.
अशा साक्रेटिसांच्या अुद्धारासाठीं पुन्हा अुठ.

अुठ !

मोडून टाक तो क्रूस,
घुमव तुझी पवित्र वाणी
सैतानाच्या विनाशासाठीं,
देवाच्या पुत्रांसाठीं

फोड तो क्रूस
नाहींतर आकाशाच्या पुत्रा,
तांबड्या आणि पांढऱ्या–
पट्टयाच्या क्रूसावर
पुन्हा अेकदां फांशी जाशील...फांशी जाशील.

★

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २८७३६ वि: काव्य
क्रमांक १५१८ नोंः दिः १२।३।६५

## ३८:

हे सुरवंटाचें जगणें
हे अंधारांतील फुलणें
हे क्षणा क्षणाला मरणें
अन् मरणा मधलें हसणें

ही सावटलेली वृत्ति
ही कोमेजलेली सृष्टि
फोडितां ग्रहांच्या कक्षा
पुरवील मनींची आशा

★

## ३९ : वेदना

दिशादिशांनी प्राशुनि घ्यावा
सुगंध संध्याकाळीं

आणि मनाच्या सांजधुलींतून
नाचत नवथर गाणीं

अंधाराची चाहूल अैकून
दृष्टि खिळावी आकाशाला

अवघडलेल्या मनीं हंसावें
नित्य गतिच्या सामर्थ्याला

दिव्या दिव्यांची टिपून घ्यावी
व्याधी कातरवेळीं

अशी काजळी नित्य हांसते
फुलत्या प्रातःकाळीं

★

# ४० : कवि मर्ढेकर

छप्पन गाणीं लिहून गेले
तदनंतर तव आली कविता
ऋचेऋचेंतून कढते नवता
मानवतेला पाहूनि द्रवता

विदूषकाची घेऊन मुद्रा
घालवूनि जडतेची निद्रा
पेटवून तें धड कीर्तिचें
फोडिलेस तूं बिंग नीतिचे

बिलंदरा तूं महाबिलंदर
तुझ्यांत होता अेक कलंदर
त्यानें केलें अघटीत कांहीं
चैतन्याला कविता लेई

REFBK-0011965
REFBK-0011965

द्रोणमूर्ति तव कविता झाली
अेकलव्य ते सारे आम्ही
तुझ्य स्मृतिला वंदन करुनि
पुनश्च घुमवूं तुझीच वाणी

—ऑल इंडिया रेडिओ पुणें केन्द्र यांचे सौजन्यानें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११०६५
ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
क्रम २८७२६ दि: ...